ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक २९ • गुरुवार दि.२२ ऑक्टोबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# जरांगेंच्या पाचशे कोटींच्या 'ऑडिओ बॉम्ब'ने राजकारणात खळबळ!



## शिंदे गट आक्रमक | भाजपनेही झटकले हात | फडणवीसांकडे चौकशीची मागणी

मुंबई/प्रतिनिधी-मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी ५०० कोटी रुपयांच्या कथित व्यवहारासंदर्भात ऑडिओ क्लिप सार्वजनिक केल्यानंतर राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाजपकडून ५०० कोटी रुपये घेतल्याचा आरोप जरांगे यांनी केला होता. त्यानंतर त्यांनी पत्रकार परिषदेत कथित ऑडिओ क्लिप ऐकवली. या क्लिपमध्ये खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून जरांगे यांना पैसे दिल्याचा दावा एका महिलेच्या आवाजातून करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. या आरोपांवरून शिवसेनेच्या शिंदे गटाने चौकशीची मागणी केली आहे. शिंदे गटाकडून भाजपच्या काही नेत्यांवर संशय व्यक्त केला जात आहे. त्यावर भाजपने कथित क्लिपची सत्यता तपासण्याची भूमिका घेतली आहे.

कथित ऑडिओ क्लिपमध्ये एकनाथ शिंदे आणि डॉ. श्रीकांत शिंदे यांचा उल्लेख झाल्याने शिवसेनेच्या शिंदे गटाने आक्रमक भूमिका घेतली आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यासाठी शिवसेनेचे वरिष्ठ शिष्टमंडळ गुरुवारी सायंकाळी सात वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याची माहिती आहे.

शिवसेना नेते तथा मंत्री उदय सामंत यांनी या प्रकरणात न्यायवैज्ञानिक, सायबर आणि विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्याची मागणी केली. कथित ऑडिओ क्लिपमधील आवाज खरे आहेत की त्यात तांत्रिक फेरफार करण्यात आला आहे, हे तपासातून स्पष्ट झाले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

क्लिपमध्ये डॉ. श्रीकांत शिंदे यांचे नाव घेऊन एकनाथ शिंदे आणि शिवसेनेची बदनामी करण्याचा प्रयत्न होत असल्याचा संशय सामंत यांनी व्यक्त केला. युतीमध्ये अशा प्रकारच्या घटना घडणे योग्य नसल्याचे सांगत, संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी त्यांनी केली.

### भाजपकडूनही चौकशीचा आग्रह

दरम्यान, भाजपचे नेते तथा मंत्री आशिष शेलार यांनीही या कथित ऑडिओ क्लिपवर प्रतिक्रिया देताना तिच्या सत्यतेबाबत प्रश्न उपस्थित केले. केवळ तंत्रज्ञानाच्या माध्यमातून तयार झालेली ध्वनिमुद्रिका म्हणजे आपोआप कायदेशीर पुरावा ठरत नाही. त्याला पुष्टी देणारे अन्य पुरावे आणि त्याची सत्यता तपासणे आवश्यक आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

कथित क्लिपमधील कोणताही आवाज भाजपच्या नेत्याचा नसल्याचे शेलार यांनी स्पष्ट केले. ही ध्वनिमुद्रिका नेमकी कशी तयार झाली, तिच्यात फेरफार करण्यात आला आहे का, ती जरांगे यांच्यापर्यंत कोणी पोहोचवली आणि ती सार्वजनिक करण्यामागील पार्श्वभूमी काय आहे, या सर्व बाबींची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करावी, अशी अपेक्षाही शेलार यांनी व्यक्त केली. तसेच कथित क्लिपच्या आधारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत संशयाचे वातावरण निर्माण करणे मान्य नसल्याचे त्यांनी नमूद केले.

### जरांगेंचा षड्यंत्राचा आरोप

दरम्यान, मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाचे आंदोलन कमकुवत करण्यासाठी आणि समाजातील आपला प्रभाव कमी करण्यासाठी षड्यंत्र रचले जात पान ४ वर

# महानगरपालिकेच्या गुंठेवारी विभागातून १८६ संचिका गायब

## आ.राजेश पवारांनी केली मंत्रालयीन चौकशीची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिकेच्या गुंठेवारी विभागातील गहाळ संचिकांच्या प्रकरणाची मंत्रालयस्तरावर स्वतंत्र चौकशी करून दोषींची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी आ.राजेश पवार यांनी नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे केली आहे.



आ.राजेश पवार यांनी महापालिकेच्या आयुक्तांकडे अनियमितेबद्दल लेखी स्वरुपात अनेक तक्रारी केल्या आहेत. महानगरपालिकेने दिलेल्या ४१ पानी उत्तराचे परीक्षण करताना अनेक प्रश्न अनुत्तरित राहिल्याचे निदर्शनास आणून देत प्रशासनाकडून स्पष्ट खुलासा मागण्यात आला आहे. महानगरपालिकेच्या नोंदीनुसार, गुंठेवारी विभागातील ६३७० संचिकांपैकी १८६ संचिका उपलब्ध नसल्याचे समितीच्या तपासणीत आढळून आले आहे. याशिवाय ८० प्रकरणांमध्ये पावत्या, पावती-पुस्तकांच्या प्रती किंवा बँक व्यवहारांच्या आवश्यक नोंदी उपलब्ध नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणांमध्ये किती रक्कम आकारण्यात आली, किती रक्कम महानगरपालिकेच्या खात्यात जमा झाली आणि आर्थिक व्यवहारांचा ताळमेळ लागला का, याची स्पष्ट माहिती प्रशासनाने द्यावी, अशी मागणी आ.पवार यांनी केली आहे.

### जुनी कागदपत्रे देऊन जबाबदारी संपत नाही

१८६ संचिका उपलब्ध नाहीत आणि ८० प्रकरणांतील आर्थिक नोंदींचा स्पष्ट हिशेब समोर आलेला नाही. संचिका कोणाच्या ताब्यात होत्या, आर्थिक व्यवहारांची पडताळणी झाली का आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली का, या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर मिळाले पाहिजे. गुन्हा दाखल झाला म्हणजे तपास पूर्ण झाला असे नाही. त्यामुळे मंत्रालयस्तरीय स्वतंत्र चौकशी, विशेष लेखापरीक्षण आणि पोलीस तपासाच्या प्रगतीचा स्पष्ट अहवाल आवश्यक आहे. दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका आ.पवार यांनी मांडली आहे.या प्रकरणी वजीराबाद पोलिस ठाण्यात १५ डिसेंबर २०२२ रोजी गुन्हा दाखल झाला होता. मात्र तपासाची सद्यःस्थिती, दोषारोपपत्र दाखल झाले आहे का, आर्थिक व्यवहारांची पडताळणी झाली का आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची भूमिका तपासली का, याबाबत पवार यांनी पोलिस अधीक्षकांकडे पत्र पाठवून माहिती मागितली आहे. सप्टेंबर २०२६ मधील तपासणीत कोठा येथील गट क्रमांक १३२ मधील भूखंड क्रमांक १ ते ४६ यांच्याशी संबंधित संचिका उपलब्ध नसल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला आहे. तसेच राज्य माहिती आयोगाच्या आदेशानंतर पान ४ वर

# दिवाळीत पुणे-मुंबईहून नांदेडसाठी विशेष रेल्वे गाड्या सुरु करा!

## खासगी ट्रॅव्हल्सकडून होणारी प्रवाशांची आर्थिक लूट थांबविण्याची किशोर देशमुख यांची मागणी

नांदेड/प्रतिनिधी-दिवाळी सणानिमित्त पुणे व मुंबई येथून नांदेडसाठी येणाऱ्या प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता, दोन्ही शहरांतून नांदेडसाठी येण्या-जाण्यासाठी प्रत्येकी किमान २ विशेष रेल्वे गाड्या सुरू कराव्यात, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांनी दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड मंडळाच्या मंडल रेल्वे व्यवस्थापकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



पुणे व मुंबई येथे शिक्षण, नोकरी आणि व्यवसायानिमित्त वास्तव्यास असलेले नांदेडसह मराठवाड्यातील हजारो विद्यार्थी, नोकरदार आणि कामगार दिवाळीच्या सणासाठी आपल्या गावी परततात. मात्र, नियमित रेल्वे गाड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गर्दी असून, आरक्षणासाठी प्रतीक्षा यादीही वाढत असल्याने प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.या परिस्थितीचा गैरफायदा घेत काही खासगी बस व ट्रॅव्हल्स चालकांकडून अवाजवी तिकीट दर आकारले जात असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे सर्वसामान्य विद्यार्थी, कामगार आणि नोकरदार वर्गावर आर्थिक भार पडत असून, पान ४ वर

# औरंगाबाद विभाग पदवीधर निवडणुकीसाठी नांदेड प्रशासन सज्ज

## जिल्ह्यात १२० मतदान केंद्रांवर ३६ हजार ६८७ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र विधान परिषदेच्या ५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी नांदेड जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. जिल्ह्यातील १२० मतदान केंद्रांवर शुक्रवार, दि.२३ ऑक्टोबर रोजी ३६ हजार ६८७ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

निवडणुकीच्या अनुषंगाने मतदानपूर्व आवश्यक तयारी पूर्ण करण्यात आली आहे. मतदान प्रक्रियेसाठी आवश्यक साहित्याचे वाटप नांदेड येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये करण्यात आले. मतदान प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व शांततेत पार पडावी, यासाठी प्रशासनाने आवश्यक नियोजन केले आहे. जिल्ह्यातील १२० मतदान केंद्रांसाठी १२० मतदान केंद्राध्यक्ष आणि त्यांच्या सहाय्यासाठी ६३० मतदान अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या अधिकारी व



कर्मचाऱ्यांना दि. २२ ऑक्टोबर रोजी प्रशिक्षण देण्यात येत असून, मतदान साहित्याचे वाटप करून त्यांना संबंधित मतदान केंद्रांवर रवाना करण्यात आले आहे. मतदान प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी ५५ क्षेत्रीय अधिकाऱ्यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे. शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार आहे. मतदानाची वेळ संपल्यानंतर सर्व मतदान पथके मतदानपेट्या सीलबंद करून नांदेड येथील शासकीय तंत्रनिकेतनमधील सुरक्षित कक्षात जमा करतील. त्यानंतर सर्व मतदानपेट्या पोलीस बंदोबस्तात छत्रपती संभाजीनगर येथील सुरक्षित कक्षात नेऊन जमा करण्यात येणार आहेत. या प्रक्रियेच्या समन्वयासाठी देगलूरचे पान ४ वर

# दिवाळीपूर्वीच पैनगंगेचा श्वास थांबल्याने सहस्त्रकुंड रुसला;चित्राने मात्र क्रूर दुष्काळ हसला



## पैनगंगाकाठच्या ४७ गावांवर जलसंकटाचे सावट

उमरखेड/प्रतिनिधी-मराठवाडा, विदर्भ आणि तेलंगणातील लाखो पर्यटकांचे आकर्षण असलेला यवतमाळ जिल्ह्यातील प्रसिद्ध सहस्त्रकुंड धबधबा यंदा दिवाळीपूर्वीच पैनगंगेचा श्वास थांबल्याने सहस्त्रकुंड रुसला या चित्राने क्रूर दुष्काळ मात्र हसला, असे म्हणण्याची वेळ सध्या पैनगंगा नदीकाठच्या शेतकरी आणि गावकऱ्यांवर आली असून सहस्त्रकुंड पूर्णपणे कोरडा पडला आहे.

ऑक्टोबरच्या पहिल्याच पंधरवड्यात पैनगंगा नदीचा प्रवाह खंडित झाल्याने दिवाळीच्या तोंडावरच निसर्गाची उधळण थांबली असून पैनगंगे काठच्या गावांच्या तोंडचे पाणीच त्यामुळे पळाले आहे. निसर्गरम्य धबधब्याचे ते फेसाळणारे, गर्जना करणारे विहंगम दृष्य आता लुप्त झाले असून, आता तिथे केवळ भेगाळलेले, विदारक काळे कातळ फक्त उरले आहे. दरवर्षी दिवाळीच्या सुट्टीत सहकुटुंब निसर्गाचा आनंद लुटण्यासाठी येथे येणाऱ्या पर्यटकांच्या पदरी यंदा प्रचंड निराशाच पडली आहे.वरवर दिसणारा हा फटका केवळ पर्यटनापुरता मर्यादित नसून पैनगंगा कोरडी पडल्याने नदीकाठच्या गावांच्या पाणीपुरवठा योजना थेट धोक्यात आल्या आहेत. ऑक्टोबरमध्येच नदी आटल्याने परिसरातील विहिरी, कूपनलिकांच्या भूजल पातळीत झपाट्याने घट झाली आहे.त्यामुळे ऐन थंडीतच पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ ग्रामस्थांवर येणार असून, जनावरांच्या पाण्याचा आणि नदीकाठच्या जैवविविधतेचा प्रश्नही गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर इसापूर (अप्पर पैनगंगा) धरणातून तातडीने पैनगंगा पात्रात पाणी सोडण्यात यावे, अशी जोरदार मागणी ४७ गावांतील नागरिकांकडून होत आहे. यापूर्वीही पाणीटंचाईच्या काळात धरणातून पाणी सोडून परिस्थिती नियंत्रणात आणल्या गेली होती.मात्र, धरणातील उपलब्ध पाणीसाठा आणि पुढील उन्हाळ्याचे नियोजन पाहता, प्रशासनासमोर याचे तांत्रिक नियोजन करण्याचे मोठे आव्हान आहे. गेल्या वर्षी जुलै अखेरपर्यंत वाट पाहिल्यानंतर सहस्त्रकुंड पूर्ण क्षमतेने वाहू लागला होता. यंदा पावसाळा संपताच काही आठवड्यांत नदी कोरडी पडल्याने भविष्यातील जलसंकटाची तीव्रता अधिकच स्पष्ट झाली आहे. केवळ तात्पुरती मलमपट्टी न करता जलसंपदा विभागाने शास्त्रीय पाणी व्यवस्थापन आणि दीर्घकालीन जलसंधारण उपाययोजना हाती घ्याव्यात, अशी मागणी पर्यावरणप्रेमींमधून होत आहे.आता पुन्हा निसर्गरम्य सहस्त्रकुंड धबधब्याचे ते फेसाळणारे, गर्जना करणारे विहंगम दृष्य पाहण्यासाठी संपूर्ण वर्षभर वाट पाहण्याशिवाय दुसरा पर्यायच उरलेला नाही.

# संस्थांच्या सुरक्षिततेचे धिंडवडे!

देशात नेमके सुरक्षित काय आहे, हा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिकांना पडू लागला आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याचा फैसला करणाऱ्या परीक्षांचे पेपर फुटतात, मतदारांच्या माहितीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होतात आणि आता देशातील सर्वांत मोठ्या सार्वजनिक क्षेत्रातील बँकांपैकी एक असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या ग्राहकांची वैयक्तिक माहिती गळती झाल्याचे समोर येते. एकामागून एक घडणाऱ्या या घटनांमुळे व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. परीक्षा सुरक्षित नाहीत, माहिती सुरक्षित नाही आणि आर्थिक व्यवहारांसाठी दिलेला वैयक्तिक तपशीलही सुरक्षित नसेल, तर सामान्य माणसाने विश्वास ठेवायचा तरी कोणावर? नीट परीक्षेतील पेपरफुटीच्या प्रकरणाने देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळली. वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न उराशी बाळगून विद्यार्थी आणि त्यांचे पालक वर्षानुवर्षे मेहनत करतात. लाखो रुपयांचा खर्च, दिवस-रात्र अभ्यास आणि मानसिक ताण सहन करून विद्यार्थी परीक्षेला सामोरे जातात. परंतु प्रश्नपत्रिकाच आधी बाहेर पडत असेल, तर प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी नेमके कोणत्या व्यवस्थेवर विश्वास ठेवायचा? या प्रकरणात केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करीत विद्यार्थ्यांनी तीव्र आंदोलने केली. मात्र, केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोप किंवा काही अधिकाऱ्यांवर कारवाई करून प्रश्न सुटणार आहे का? परीक्षा यंत्रणेतील त्रुटी दूर करण्याची जबाबदारी कोण घेणार, हा खरा प्रश्न आहे. नीटपुरता हा प्रश्न मर्यादित राहिला नाही. महाराष्ट्रात एमपीएससीच्या परीक्षेतील कथित पेपरफुटीच्या प्रकरणाने विद्यार्थ्यांना रस्त्यावर उतरावे लागले. पुण्यात प्रदीर्घ आंदोलन झाले. सरकारी नोकरी मिळवण्यासाठी स्पर्धा करणाऱ्या तरुणांचा वेळ, पैसा आणि आयुष्यातील महत्त्वाची वर्षे पणाला लागलेली असतात. अशा वेळी परीक्षेच्या गोपनीयतेशी तडजोड झाल्याचा संशय निर्माण झाला, तर केवळ परीक्षा प्रक्रियेचे नव्हे, तर संपूर्ण भरती व्यवस्थेचे पावित्र्य धोक्यात येते. यूपीएससीसारख्या प्रतिष्ठित परीक्षांच्या सुरक्षिततेबाबतही प्रश्न उपस्थित होत असतील, तर ही बाब अधिक चिंताजनक आहे. प्रत्येक वेळी चौकशीचे आश्वासन देण्यापेक्षा गैरप्रकार होणारच नाहीत, अशी व्यवस्था उभी करणे अधिक महत्त्वाचे आहे. मतदार पुनर्परीक्षण कार्यक्रमादरम्यानही मतदारांच्या नोंदी, नावांची वगळणी आणि माहितीच्या अचूकतेबाबत विविध गंभीर प्रश्न पुढे आले आहेत. लोकशाहीत मतदार यादी ही केवळ कागदपत्रांची नोंद नसते; ती नागरिकाच्या मतदानाच्या अधिकाराचा पाया असते. त्या प्रक्रियेत पारदर्शकतेबाबत शंका निर्माण झाल्या, तर नागरिकांचा निवडणूक व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होऊ शकतो. परीक्षा असो वा निवडणूक, गोपनीयता, अचूकता आणि निष्पक्षता या तीन गोष्टींशी तडजोड परवडणारी नाही.आता स्टेट बँक ऑफ इंडियाच्या ग्राहकांच्या माहितीगळतीचे वृत्त समोर आले आहे. २१ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, डार्क वेबवर उपलब्ध झालेल्या सुमारे तीन लाख ७५ हजार नोंदींच्या प्राथमिक तपासणीत ३,८९७ ग्राहकांच्या वैयक्तिक माहितीशी संबंधित नोंदी आढळल्या. त्यामध्ये नावे, मोबाइल क्रमांक, जन्मतारखा, ई-मेल, पत्ते आणि कर्जविषयक नोंदींशी संबंधित तपशील असल्याचे सांगण्यात आले. बँकेने या घटनेची चौकशी सुरू केली असून, माहितीच्या गळतीचा नेमका स्रोत आणि व्याप्ती निश्चित होणे बाकी आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाचा तपास होण्याआधी निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही; पण ही घटना गंभीर आहे, यात शंका नाही. बँकांचे राष्ट्रीयीकरण हा भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचा टप्पा होता. सावकारी, आर्थिक शोषण आणि खासगी बँकांच्या मर्यादित पोहोचीतून सर्वसामान्यांना बाहेर काढून संस्थात्मक बँकिंगशी जोडण्याच्या प्रक्रियेत सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी मोठी भूमिका बजावली. शेतकरी, कामगार, छोटे व्यावसायिक, निवृत्त कर्मचारी आणि मध्यमवर्गीय कुटुंबे आपल्या आयुष्यभराच्या कमाईसाठी या बँकांवर विश्वास ठेवतात. त्यामुळे ग्राहकांची माहिती बाहेर जाणे हा केवळ तांत्रिक दोष नसून त्या विश्वासाला बसलेला धक्का आहे.बँकेने ग्राहकांची शिल्लक रक्कम सुरक्षित असल्याचे सांगितले, तरी प्रश्न संपत नाही. वैयक्तिक माहितीचा वापर करून बनावट फोन, ओटीपी मागणारे संदेश, कर्जाच्या नावाखाली फसवणूक आणि आर्थिक सायबर गुन्हे होण्याचा धोका वाढू शकतो. म्हणूनच बाधित ग्राहकांना वेळेवर माहिती देणे, संभाव्य धोके स्पष्ट करणे, स्वतंत्र तांत्रिक तपास करणे आणि दोषींवर कारवाई करणे आवश्यक आहे. सायबर सुरक्षेवरील खर्च हा अतिरिक्त बोजा नसून ग्राहकांच्या विश्वासाचे संरक्षण करण्यासाठीची अनिवार्य गुंतवणूक आहे. आज प्रश्न फक्त पेपर कोण फोडतो किंवा माहिती कोण चोरतो, एवढाच नाही. प्रश्न असा आहे की, एवढ्या महत्त्वाच्या व्यवस्था सांभाळणाऱ्या संस्थांमध्ये त्रुटी राहतातच कशा? प्रत्येक घटनेनंतर चौकशी, समिती आणि आश्वासनांचा पाऊस पडतो; पण पुढची गळती थांबते का? जबाबदारी निश्चित होते का? सामान्य नागरिकाला न्याय मिळतो का? अजून काय काय लीक होणार, याची वाट पाहायची की गळती रोखणारी सक्षम व्यवस्था उभी करायची? सरकार आणि संबंधित संस्थांनी या प्रश्नाचे उत्तर कृतीतून द्यावे. विद्यार्थ्यांचे भविष्य, मतदारांचा अधिकार आणि ग्राहकांची आर्थिक सुरक्षितता ही प्रयोग करण्याची क्षेत्रे नाहीत. विश्वास एकदा तुटला की तो पुन्हा निर्माण करणे कठीण असते. त्यामुळे आता आश्वासनांचा नव्हे, तर कठोर उत्तरदायित्वाचा काळ आहे. अन्यथा प्रत्येक नव्या गळतीनंतर नागरिकांच्या मनात एकच प्रश्न घुमत राहील, पुढचा नंबर कोणाचा?

# नव्या वर्चस्वयुद्धाचा अन्वयार्थ

डॉ.स्वप्नील तोरणे

भारताच्या दूरसंचार क्षेत्राने गेल्या दशकात अभूतपूर्व स्थित्यंतरे अनुभवली. मोबाईल डेटाच्या किमती कमी झाल्या, इंटरनेट सामान्य माणसाच्या हातात आले आणि डिजिटल व्यवहारांपासून ऑनलाइन शिक्षणापर्यंत अनेक क्षेत्रांचे स्वरूप बदलले. या परिवर्तनामध्ये रिलायन्स जिओने महत्त्वाची भूमिका बजावली. आता याच भारतीय बाजारपेठेत एलॉन मस्क यांच्या स्टारलिंक या उपग्रहाधारित इंटरनेट सेवेच्या प्रवेशामुळे स्पर्धेचे नवे पर्व सुरू होण्याची चिन्हे आहेत.

सॅटेलाईट इंटरनेटच्या माध्यमातून भारताच्या डिजिटल भवितव्याला नवी दिशा देण्याची एलॉन मस्क यांची महत्त्वाकांक्षा आणि रिलायन्ससारख्या भारतीय उद्योगसमूहाचे प्रस्थ यांच्यातील स्पर्धा ही केवळ दोन कंपन्यांमधील व्यावसायिक लढाई नाही. ती भविष्यातील इंटरनेट, स्पेक्ट्रमचे धोरण, ग्राहकांचे हित आणि देशाच्या डिजिटल सार्वभौमत्वाशी जोडलेली आहे. सॅटेलाईट इंटरनेटच्या आगमनाने भारतीय दूरसंचार क्षेत्रात निर्माण होणारी स्पर्धा ही केवळ तंत्रज्ञानाची लढाई नाही. अब्जावधी रुपयांची गुंतवणूक, ग्राहक मिळवण्याचा खर्च, स्पेक्ट्रमच्या वापराचे अर्थकारण, पायाभूत सुविधांवरील मक्तेदारी आणि भविष्यातील महसुलाचे गणित या सगळ्यांचा त्यात समावेश आहे.

या संघर्षात कोणाला किती फायदा होईल आणि कोणाच्या व्यवसायावर किती दबाव येईल, याच्याशी आपल्यासारख्या सर्वसामान्य मनुष्याला मला काय त्याचे? असा नेहमीप्रमाणे पवित्रा न घेता परिस्थिती समजून घेणे आवश्यक आहे. या स्पर्धेचे स्वरूप पारंपरिक दूरसंचार कंपन्यांमधील स्पर्धेपेक्षा वेगळे आहे. एकीकडे फायबर केबल, मोबाईल टॉवर्स आणि जमिनीवरील नेटवर्कच्या बळावर उभे असलेले भारतीय दूरसंचार विश्व आहे; तर दुसरीकडे पृथ्वीभोवती फिरणाऱ्या हजारो उपग्रहांच्या माध्यमातून इंटरनेट पोहोचवण्याची क्षमता असलेले जागतिक तंत्रज्ञानाचे




सामर्थ्य आहे. आज भारतातील प्रत्येक सामान्य माणूसदेखील कुठल्यानं कुठल्या पध्दतीने इंटरनेटचा वापर करत असतो म्हणूणच या दोन भिन्न तंत्रज्ञानपद्धतींचा संघर्ष भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेची पुढील दिशा ठरवू शकतो.

स्टारलिंक आणि रिलायन्स यांच्यातील मतभेदांचा केंद्रबिंदू म्हणजे उपग्रह इंटरनेटसाठी आवश्यक असलेल्या स्पेक्ट्रमचे वाटप. स्पेक्ट्रम म्हणजे वायरलेस संदेशवहनासाठी वापरल्या जाणाऱ्या रेडिओ फ्रिक्वेन्सींचा मर्यादित आणि महत्त्वाचा स्रोत. स्टारलिंकची सर्वांत मोठी ताकद म्हणजे इंटरनेटसाठी प्रत्येक ठिकाणी मोबाईल टॉवर किंवा जमिनीखाली फायबर केबल टाकण्याची आवश्यकता तुलनेने कमी करणे. पृथ्वीच्या जवळच्या कक्षेत फिरणाऱ्या उपग्रहांच्या जाळ्याद्वारे ग्राहकांच्या ठिकाणी बसवलेल्या विशिष्ट उपकरणापर्यंत इंटरनेट पोहोचवता येते.

यामुळे हिमालयातील दुर्गम गावे, सीमावर्ती भाग, समुद्रातील जहाजे, जंगल परिसर, पर्यटनस्थळे, खाणकामाची ठिकाणे आणि आपत्तीग्रस्त भाग यांना विशेष फायदा होऊ शकतो. पूर, भूकंप किंवा भूस्खलनामुळे जमिनीवरील दूरसंचार यंत्रणा खंडित झाली, तरी उपग्रह इंटरनेट पर्यायी संपर्कव्यवस्था उपलब्ध करून देऊ शकते. भारतासारख्या भौगोलिक आणि सामाजिक विविधता असलेल्या देशात ही क्षमता महत्त्वाची आहे. डिजिटल दरी कमी करण्यासाठी इंटरनेट उपलब्ध करून देणे आवश्यक असले, तरी केवळ कनेक्शन उपलब्ध असणे पुरेसे नाही. सेवा परवडणारी असणे, वीज उपलब्ध असणे, उपकरणांची किंमत व्यवहार्य असणे आणि डिजिटल साक्षरता असणेही तितकेच आवश्यक आहे.स्टारलिंकची मर्यादाही लक्षात घ्यावी लागेल. ग्राहकाला विशेष टर्मिनल किंवा डिश, वीज आणि योग्य आकाशदृश्य आवश्यक असते. उपकरणे, मासिक शुल्क आणि देखभालीचा खर्च मोठ्या प्रमाणावर असू शकतो. त्यामुळे भारतातील सर्वसामान्य मोबाईल ग्राहकांसाठी जिओच्या स्वस्त डेटा पॅकची जागा स्टारलिंक तातडीने घेईल, असे मानणे वास्तववादी ठरणार नाही. रिलायन्स जिओचे सामर्थ्य भारतातील विशाल ग्राहकवर्ग, मोबाईल टॉवर्स, फायबर नेटवर्क, किरकोळ विक्रीचे जाळे आणि भारतीय बाजारपेठेचे सखोल ज्ञान यात आहे. स्टारलिंककडे जागतिक उपग्रह जाळे आणि दुर्गम प्रदेशांमध्ये इंटरनेट पोहोचवण्याचे तंत्रज्ञान आहे. म्हणून या दोन्ही कंपन्यांची स्पर्धा सरळ एका बाजारपेठेतील दुसऱ्या कंपनीशी होणारी स्पर्धा नाही. शहरांमधील दाट लोकवस्तीच्या भागात फायबर आणि मोबाईल नेटवर्क किफायतशीर ठरू शकते; तर दुर्गम प्रदेशांत उपग्रह इंटरनेट अधिक व्यवहार्य ठरू शकते. याच संदर्भात एक महत्त्वाची बाब समोर येते. गेल्यावर्षी रिलायन्स जिओ आणि स्पेसएक्स यांनी स्टारलिंक सेवा भारतात उपलब्ध करून देण्यासंदर्भात भागीदारी जाहीर केली होती. या व्यवस्थेत जिओच्या वितरण जाळ्याचा उपयोग होण्याची शक्यता होती. यापूर्वी एअरटेलशीही अशा प्रकारची भागीदारी जाहीर झाली होती. म्हणजेच, एका बाजूला स्पेक्ट्रम आणि बाजारपेठेवरून मतभेद, तर दुसऱ्या बाजूला व्यावसायिक सहकार्याची शक्यता, असे या संबंधांचे दुहेरी स्वरूप आहे.

व्यवसायविश्वात याला विरोधाभास म्हणता येईल; पण प्रत्यक्षात तो व्यावसायिक वास्तववाद आहे. प्रतिस्पर्ध्याचे तंत्रज्ञान आपल्या वितरणव्यवस्थेला पूरक ठरत असेल, तर सहकार्य करणे फायद्याचे ठरू शकते. त्याच वेळी भविष्यातील ग्राहक, किंमत आणि बाजारातील वर्चस्व यासाठी संघर्ष सुरू राहू शकतो. स्टारलिंकच्या भारतातील प्रवेशासंबंधी चर्चेत सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे तो किमतीचा. एलॉन मस्क यांनी भारतात स्टारलिंकची सेवा परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. मात्र, त्यांनी अद्याप भारतासाठीचे निश्चित दर जाहीर केलेले नाहीत. भारतात मोबाईल डेटाचे दर जागतिक स्तरावर अत्यंत कमी आहेत. त्यामुळे स्टारलिंकला भारतीय ग्राहक मिळवायचे असतील, तर केवळ तंत्रज्ञानाची चमक पुरेशी ठरणार नाही. किंमत, सेवा-गुणवत्ता आणि ग्राहकांना मिळणारे प्रत्यक्ष फायदे यांची कसोटी पार करावी लागेल. परदेशी कंपन्यांशी स्पर्धा करताना भारतीय उद्योगांना तंत्रज्ञान हस्तांतरण, संशोधन, कौशल्यविकास आणि स्थानिक रोजगार यांच्या संधी मिळायला हव्या. या दोन्ही व्यवस्थांमध्ये स्पर्धा असेलच; पण भविष्यात त्या एकमेकांना पूरकही ठरू शकतात. शहरांमध्ये फायबर आणि मोबाईल नेटवर्क, तर दुर्गम भागांमध्ये उपग्रह इंटरनेट, असे मिश्र प्रारूप भारतासाठी अधिक उपयुक्त ठरू शकते का, याचेही अध्ययन होणे गरजेचे आहे. शेवटी, या लढाईत कोण जिंकले, यापेक्षा भारतातील सामान्य नागरिकाला काय मिळाले, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. इंटरनेट अधिक परवडणारे झाले, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली, ग्रामीण रुग्णालयांचा संपर्क सुधारला आणि उद्योगांना नव्या बाजारपेठा उपलब्ध झाल्या, तरच या स्पर्धेचे खरे औचित्य सिद्ध होईल. आकाशातील उपग्रह आणि जमिनीवरील नेटवर्क यांच्यातील स्पर्धा ही तंत्रज्ञानाच्या नव्या युगाची नांदी आहे. या स्पर्धेचा अंतिम विजेता एखादा अब्जाधीश किंवा एखादी कंपनी नसावी; तर डिजिटल संधींची वाट पाहणारा भारतातील सामान्य नागरिक असावा एवढीच या निमित्ताने अपेक्षा.

*-आपलं महानगर वरुन साभार*

## पशुधनासाठी चारा उपलब्धतेसाठी कृषी अवशेषांचा ५० टक्के साठा राखून ठेवा-जिल्हाधिकारी

नांदेड/प्रतिनिधी- जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी पुरेसा चारा उपलब्ध व्हावा, यासाठी कृषी अवशेषांचा योग्य वापर करून चारा निर्मितीला प्राधान्य द्यावे. उपलब्ध कृषी अवशेषांच्या साठ्यापैकी ५० टक्के साठा जनावरांसाठी चारा प्रक्रिया करण्याकरिता उपलब्ध करून द्यावा, अशा सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी कृष्णूर औद्योगिक क्षेत्रातील अभिजित बायोकोल इंडस्ट्रीज आणि गोदावरी प्लायवूड पार्टिकल इंडस्ट्री या उद्योगांना प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी उद्योजकांशी चर्चा करून कृषी अवशेषांचा वापर, उपलब्ध साठा आणि पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजनांचा आढावा घेतला. यावेळी पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. नांदेड जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने उपाययोजना हाती घेतल्या आहेत. याअंतर्गत पिकांचे अवशेष, सोयाबीन कुटार आणि उसाचा चोथा पशुखाद्यासाठी उपलब्ध व्हावा, यासाठी वाहतूक व विक्रीसंदर्भात आदेश निर्गमित करण्यात आले



आहेत. या आदेशांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी औद्योगिक प्रकल्पांना भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली. बायोकोल निर्मिती तसेच अन्य औद्योगिक प्रक्रियांसाठी वापरल्या जाणाऱ्या कृषी अवशेषांपैकी उपलब्ध साठ्याचा काही भाग पशुधनासाठी चारा निर्मितीकरिता राखून ठेवण्याचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. दुष्काळाच्या काळात पशुधनाला चारा उपलब्ध होणे आवश्यक असल्याने संबंधित उद्योगांनी प्रशासनाच्या उपाययोजनांना सहकार्य करावे, असेही त्यांनी सांगितले. सोयाबीन कुटार आणि उसाच्या चोथ्यावर योग्य पद्धतीने युरिया-मोलॅसिस प्रक्रिया केल्यास त्यांचे पोषणमूल्य वाढविण्यास मदत होते. त्यामुळे चारा टंचाईच्या काळात अशा प्रक्रियायुक्त कृषी अवशेषांचा पर्यायी पशुखाद्य म्हणून उपयोग करता येतो. उपलब्ध साधनसामग्रीचा योग्य वापर करून चारा निर्मिती वाढविणे आणि पशुधनाचे पोषण सुनिश्चित करणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी अधोरेखित केले.

## सहयोगनगर येथे वर्षावास व ग्रंथ वाचन समारोप समारंभाचे आयोजन

नांदेड/प्रतिनिधी-माता रमाई आंबेडकर बुद्ध विहार सहयोग नगर नांदेड येथे पूज्य भिक्खू शिलरत्न थेरो यांचा १४ वा वर्षावास आणि मिलिंद प्रश्न या ग्रंथ वाचनाचा समारोप समारंभाचा कार्यक्रम दि.२४ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. सकाळच्या सत्रात पूज्य भिक्खू शीलरत्नजी थेरो यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कार्यक्रमात पूज्य भिक्खू उपगुप्तजी महाथेरो (पूर्णा) आणि पूज्य भिक्खू करुणानंदजी महाथेरो छ.संभाजीनगर यांची धम्म देसना संपन्न होईल.

सायंकाळच्या सत्रामध्ये महाराष्ट्राचे ख्यातनाम गायक चेतन चोपडे आणि विनोद गोडबोले यांचा सूर समतेचा बुद्ध आणि भीम गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन ठीक ६.३० वाजता करण्यात आले आहे. कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती आ.बालाजीराव कल्याणकर, वॉर्ड ५ चे नगरसेवक ॲड. महेश कनकदंडे, जयश्री निलेश पवाडे, साहेबराव गायकवाड, शांभवी प्रवीण साले यांची राहिल. प्रमुख पाहुणे प्रफुलदादा सावंत, ॲड. धम्मा कदम, इंजी.अशोकराव येरेकर, इंजी. भरत कानिंदे, गणपतराव गायकवाड, इंजी. यशवंतराव गच्चे, डॉ. भीमराव हटकर, पंढरीनाथ बोकारे, डी.डी. भालेराव, दामोदर सरकटे, ईश्वर जोंधळे, डॉ. राहुल थोरात, सुभेदार मारुती सोनकांबळे, विजयकुमार उजेडकर, देवरावजी झगडे राहतील. प्रमुख उपस्थिती सुरेशराव महाबळे, साहेबराव पुंडगे, सदाशिवराव गच्चे, मनोजकुमार साखरे, प्रा.पुरुषोत्तम कांबळे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सदरील कार्यक्रमाचे आयोजन भारतीय बौद्ध महासभा, बुद्ध कीर्ती चॅरिटेबल ट्रस्ट आणि माता रमाई आंबेडकर महिला मंडळ सहयोगनगर तर्फे करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महिला मंडळाच्या अध्यक्षा उपा. जयाताई सूर्यवंशी, उपा.राजेश बीऱ्हाडे, उपा.भिमाबाई गजभारे, उपा. पुष्पाताई भरणे, उपा.भारती बीऱ्हाडे, उपा. रेखा कोकरे, उपा.चंद्रकलाबाई लंके, उपा. मीनाक्षीताई खंदारे, उपा. कल्पनाताई ओव्हाळ, उपा. सागरबाई मल्हारे, आणि सर्व महिला मंडळाच्या सदस्या परिश्रम घेत आहेत. कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे अवाहन ते भारतीय बौद्ध महासभेचे शहर सरचिटणीस रमेश कोकरे यांनी केली आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# कुपटी (खु.) ग्रा.पं.मधील पंधरावा वित्त आयोग आणि पेसा निधीत मोठा गैरव्यवहार

## तत्कालीन ग्रामविकास अधिकाऱ्यासह अन्य व्यक्तींनी निधी हडपल्याचा आरोप

किनवट/प्रतिनिधी-कुपटी (खु.) ग्रामपंचायतीमधील पंधरावा वित्त आयोग आणि पेसा निधीमध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. तत्कालीन ग्रामविकास अधिकारी आणि संबंधित व्यक्तींनी संगनमत करून हा निधी परस्पर हडप केल्याचा आरोप उपसरपंच आणि आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी केला आहे. याप्रकरणी पंचायत समितीच्या भूमिकेवरही संशय व्यक्त करण्यात येत असून, प्रकरणाची सखोल चौकशी करून कारवाई करण्याची मागणी उपसरपंच विनोद चव्हाण आणि माजी सरपंच नारायण टारपेंनी केली आहे.

किनवट पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रातील कुपटी (खु.) ग्रामपंचायतीत तत्कालीन ग्रामविकास अधिकारी सुनिल देशमुखे यांनी तत्कालीन सरपंचांच्या डिजिटल सिग्नेचर ला स्वतःचा ई-मेल आयडी जोडून परस्पर ओटीपी मिळवला. या माध्यमातून पंधरावा वित्त आयोगाचा व पेसाचा निधी संबंधित व्यक्तींच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आला. हा गैरव्यवहार १५ सप्टेंबर रोजी ग्रामपंचायतीचे उपसरपंच आणि सर्व सदस्यांच्या निदर्शनास आला. त्यानंतर त्वरित पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना लेखी तक्रार सादर करण्यात आली होती.

### गटविकास अधिकाऱ्यांवर संगणमताचा आरोप

ग्रामस्थांनी तक्रार देऊनही संबंधित गटविकास अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी न करता ग्रामविकास अधिकारी दिपक वानोळे यांना वाचवण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. पेसाचा निधी काढताना माझी सही नाही, तो चेक कुणीतरी सही मारून वटवला आहे, अशी स्वतःच खोटी तक्रार देऊन ग्रामविकास अधिकाऱ्यांनी स्वतःची पाठराखण करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, ग्रामपंचायत कार्यालयाचे सचिव या नात्याने सर्व शासकीय व आर्थिक व्यवहारांचे दप्तर सांभाळणे आणि आर्थिक व्यवहारांची जोपासना करणे ही ग्रामविकास अधिकाऱ्याची नैतिक जबाबदारी असताना, परस्पर चेकबुक कसे दिले जाऊ शकते? असा सवाल उपस्थित करत यामध्ये ग्रामविकास अधिकाऱ्यांचे आर्थिक हितसंबंध असल्याचा संशय वर्तवण्यात आला आहे. हा प्रकार अतिशय गंभीर स्वरुपाचा असून याची नियमानुसार उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या अर्जावर उपसरपंच विनोद रामराव चव्हाण आणि माजी सरपंच नारायण देवराव टारपे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या संबंधी संबंधितांशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला मात्र संपर्क होऊ शकला नाही.

# भारतीय प्रवाशांना नेणाऱ्या बोटीवर सौदीचा हल्ला

अबूधाबी:लाल समुद्रात भारतीय नागरिकांना घेऊन जाणाऱ्या एका बोटीवर सौदी अरेबियानं एअर स्ट्राईक केल्याचा दावा समोर आला आहे. जुकर बेटाजवळ एका बोटीला लक्ष्य करण्यात आलं. त्या बोटीत १४ भारतीय होते, अशी माहिती येमेनच्या हुती बंडखोरांनी दिली आहे. आमची पथकँ बोटीतील प्रवाशांचा जीव वाचवण्याचा प्रयत्न करत असल्याची माहिती हुतींचे सैन्य प्रवक्ते ब्रिगेडियर जनरल याह्या सरी यांनी दिली. या घटनेबद्दल हुतींनी अतिशय त्रोटक माहिती दिली आहे.

हुती सैन्य प्रवक्ते याह्या सरी यांनी सोशल मिडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एक पोस्ट केली आहे. 'सौदी अरेबियानं लाल समुद्रातील जुकर बेटाजवळ एका भारतीय बोटीला लक्ष्य केलं. प्राथमिक माहितीनुसार या बोटीत १४ भारतीय होते. त्यांना वाचवण्याचे प्रयत्न हुतींकडून सुरू आहेत. याबद्दलची पुढील माहिती नंतर दिली जाईल,' असं पोस्टमध्ये नमूद करण्यात आलं आहे.सौदी अरेबियाची कारवाई अतिशय बेजबाबदार असल्याचं याह्या सरी यांनी म्हटलं. या प्रकारच्या कारवायांमुळे लाल सागरातील आंतरराष्ट्रीय जहाजांच्या वाहतुकीला धोका निर्माण होतो, असं सरी म्हणाले. सौदी अरेबियाला अशा कारवायांपासून रोखण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायानं पुढाकार घ्यावा, असं आवाहन त्यांनी केलं.ज्या परिसरात बोटीवर हल्ला करण्यात आल्याचा दावा केला गेला आहे, तो परिसर लाल सागरात जुकर बेटाजवळ आहे. हा भाग बाब अल-मंदेब जलमार्गाच्या अगदी जवळ आहे. बाब अल मंदेब अतिशय अरुंद जलमार्ग आहे. हा मार्ग एडनच्या खाडीला हिंदी महासागराशी जोडतो. या मार्गानं आंतरराष्ट्रीय व्यापार मोठ्या प्रमाणात चालतो.

# ज्ञानेश कुमार हटवण्यासाठी मुदखेडमध्ये काँग्रेसचा मोर्चा



मुदखेड/प्रतिनिधी-मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना हटवण्याच्या मागणीसाठी मुदखेडमध्ये काँग्रेसच्या वतीने आज दि.२२ ऑक्टोबर रोजी गुरुवारी सकाळी मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. हा मोर्चा कालेज देवी येथून जुने पोलीस ठाणे मोंढा मुदखेड येथून आंबेडकर पुतळा नियोजित जागेपासून तहसील कार्यालयाकडे नेण्यात आला.

या मोर्चात प्रमुख म्हणून पप्पू पाटील कोंडेकर, बालाजी गाढे, विठठल पावडे, प्रताप देशमुख, राजा अपाकोतावार, करीम खासाब, गंगाधर डांगे, गिरीश कोत्तावार, अविनाश चौदंते, मुजीब पठाण, संजय बोकेफोड, शिवानंद देवके यांच्यासह असंख्य कार्यकर्ते मोर्चात सहभागी झाले होते. मोर्चात वोट चोर ज्ञानू तुम्ही जाना पडेगा, वोट चोर कहा मिलेगी बीजेपी के दप्तर मे, मोदी हटाव देश बचाओ, भारतिय संविधानाचा विजय असो अशा घोषणा देण्यात आल्या. काँग्रेस पक्षाच्या एका शिष्टमंडळाने नायब तहसीलदार मारोती जगताप यांना मागण्यांचे निवेदन दिले.

# ताईचं माहेर,ताईला आहेर;आ.राजेश पवार यांचा दुष्काळग्रस्त कुटुंबांसाठी मदतीचा हात



नायगाव/प्रतिनिधी-नायगाव विधानसभा मतदारसंघात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर अल्पभूधारक शेतकरी व भूमीहीन शेतमजूर कुटुंबांना दिलासा देण्यासाठी आ.राजेश पवार यांनी सामाजिक उपक्रम हाती घेतला आहे. ताईचं माहेर, ताईला आहेर या संकल्पनेतून मतदारसंघातील पात्र कुटुंबातील मुलींच्या विवाहासाठी त्यांच्या स्वखर्चातून भांड्यांचा संच आहेर स्वरूपात देण्यात येणार आहे.

या उपक्रमाचा लाभ केवळ अल्पभूधारक शेतकरी व भूमीहीन शेतमजूर कुटुंबातील मुलींच्या विवाहासाठीच घेता येणार असून, संबंधित वधू ही नायगाव विधानसभा मतदारसंघातीलच रहिवासी असणे आवश्यक आहे. ९ जानेवारी २०२७ ते ३१ मे २०२७ या कालावधीत होणाऱ्या विवाह समारंभांसाठी हा उपक्रम लागू राहणार आहे. लाभासाठी वधूचे संपूर्ण नाव, गाव, पत्ता तसेच वधू किंवा पालकांचा मोबाईल क्रमांक आदी माहिती ९१८५२५९९५ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सदर क्रमांक केवळ व्हॉट्सअॅपसाठी असून त्यावर फोन करू नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे. व्हॉट्सअॅपवर माहिती पाठवल्यानंतर संबंधित कुटुंबाशी कार्यकर्ते व सदस्य संपर्क साधून पुढील आवश्यक माहिती घेणार आहेत.दुष्काळाच्या संकटात विवाहाचा खर्च पेलणाऱ्या शेतकरी व शेतमजूर कुटुंबांना आधार देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

यापूर्वीही नायगाव विधानसभा मतदारसंघात आ.राजेश पवार यांच्या स्वखर्चातून विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले असून, त्याद्वारे गरजू कुटुंबांना मदतीचा हात देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

# मौ.तमलूर शिवारातील जुगार अड्ड्यावर पोलीस उपअधीक्षकांची कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील मौजे तमलूर शिवारात सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलीस उपअधीक्षक किरण पोपळघट यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथकाने बुधवारी धाड टाकुन आठ जणांना अटक केली आहे. त्यांच्या जवळून १ लाख ८६ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला.

मौजे तमलूर शिवारातील सचिन नामावार यांच्या शेतात जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांना मिळाली. त्यांनी सदरील जुगार अड्ड्यावर कारवाई करण्याचे निर्देश पोलीस उपअधीक्षक किरण पोपळघट यांना दिले. बुधवारी पोलीस उपअधीक्षक किरण पोपळघट यांच्या नेतृत्वाखाली प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक वैभव पडवळ, महिला फौजदार किरण बेबडे व पोलीस कर्मचाऱ्यांनी सदरील जुगार अड्ड्यावर छापा टाकला. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना नितीन हनमंत नामावार (वय ३३), अरुण नागनाथराव मुंडकर (वय २९), अर्जुन सुरेश तोटावार (वय २२), हर्ष सुरेश तोटावार (वय २४), किरण मोहन माचीनवार, विठ्ठल बेलकर, शेख जहागीर, सचिन हनमंत नामावार सर्व रा.तमलूर यांना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यांच्याकडून जुगाराचे साहित्य, सात मोबाईल, तीन दुचाकी, रोख रक्कम असा १ लाख ८६ हजार रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला. याप्रकरणी देगलूर पोलीस ठाण्यात आठ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मुलांना आधुनिक शिक्षणासोबत संस्कारक्षम शिक्षण देण्याची गरज-आ.कासमी



उमरखेड/प्रतिनिधी-समाजाची प्रगती ही केवळ चांगल्या शिक्षणावर अवलंबून असते. पालकांनी मुलांना आधुनिक शिक्षणासोबतच संस्कारक्षम शिक्षण दिले पाहिजे, असे प्रतिपादन आ.मुफ्ती मोहम्मद इस्माईल कासमी यांनी केले आहे. स्थानिक एम.के. मंगल कार्यालयात झालेल्या 'इस्लाह -ए-मआशरा' समाज सुधारणा सभा आणि बक्षीस वितरण सोहळ्यात ते बोलत होते.

आ.मुफ्ती कासमी यांनी कुरआन आणि हदीसच्या प्रकाशात मार्गदर्शन केले. मुलांना कुराणच्या मूलभूत शिकवणीची जाणीव करून देणे ही काळाची गरज आहे. मुस्लिम बांधवांनी मशिदींची जबाबदारी घेऊन सामाजिक ऐक्य दृढ करावे, असे आवाहन त्यांनी केले. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण पवित्र कुराणवर आधारित परीक्षा होते. यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीसे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात कुराण पठणाने झाली, हाफिज खलील यांनी नाअत-ए-पाक सादर केली. यावेळी जमियत उलेमा महाराष्ट्रच्या पदाधिकाऱ्यांनी समाजोपयोगी कार्याचा आढावा मांडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान हाफिज अन्सार हुसैनी यांनी भूषवले, तर सूत्रसंचालन मुफ्ती अब्दुल अझीझ रहमानी यांनी केले. मुफ्ती इस्माईल कासमी यांच्या दुआने सोहळ्याची सांगता झाली. यावेळी परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तामिळनाडूत २६ ऑक्टोबर पर्यंत अतिवृष्टीचा इशारा

नवी दिल्ली:बंगालच्या उपसागरात शुक्रवारपर्यंत कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याची शक्यता असून, त्याचे पुढे चक्रीवादळात रूपांतर होऊ शकते. दरम्यान, तामिळनाडूमध्ये २६ ऑक्टोबरपर्यंत मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. तामिळनाडू आणि पुद्दुचेरीसाठी मुसळधार पाऊस, वादळी वारे आणि विजांच्या कडकडाटाचा इशाराही देण्यात आला आहे.

चेन्नई हवामान केंद्राचे संचालक दुरई यांनी दिलेल्या माहितीनुसार, बंगालच्या उपसागराच्या आग्नेय भागात आणि लगतच्या पूर्व-मध्य भागात कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्यासाठी अनुकूल परिस्थिती आहे. ही हवामान प्रणाली अधिक तीव्र होऊन पश्चिम आणि नैऋत्य दिशेने सरकण्याची शक्यता आहे. पुढील काळात तिचे चक्रीवादळात रूपांतर होण्याचीही शक्यता वर्तवण्यात आली आहे.मात्र, संभाव्य चक्रीवादळाचा तामिळनाडूवर थेट परिणाम होण्याची शक्यता नसल्याचे दुरई यांनी स्पष्ट केले. हवामान प्रणाली विकसित होत असताना तिची तीव्रता आणि मार्ग याबाबत अधिक स्पष्टता येईल, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, तामिळनाडूमध्ये ईशान्य मोसमी पावसाचा जोर वाढला आहे. बुधवारी सकाळी ८.३० वाजेपर्यंतच्या २४ तासांत राज्यातील तीन जिल्ह्यांत अतिवृष्टी, तर १३ तालुक्यांमध्ये मुसळधार पावसाची नोंद झाली. चेन्नईतील एमजीआर नगर येथे सर्वाधिक १५.४ सेंटीमीटर पाऊस झाला.दक्षिण बंगालचा उपसागर आणि दक्षिण तामिळनाडूच्या लगतच्या भागात यापूर्वीच कमी दाबाचे आणखी एक क्षेत्र निर्माण झाले आहे. हे क्षेत्र फार तीव्र होण्याची शक्यता नसली, तरी त्याच्या प्रभावामुळे दक्षिणेकडील जिल्ह्यांत अतिवृष्टी होऊ शकते. राज्याच्या अन्य भागांतही चांगला पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

# धर्माबाद शहरात दोन ठिकाणी उड्डाणपुलांचे काम सुरु

धर्माबाद/प्रतिनिधी-शहरात वाहतूक कोंडीची समस्या सोडवण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वे मार्गावर दोन महत्त्वाच्या उड्डाणपुलांचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. या दोन्ही उड्डाणपुलांवर गर्डर (लोखंडी खांब) टाकण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम आज २२ ऑक्टोबर पासून सुरू झाले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता हनुमंतराव नरवाडे यांनी या कामाची अधिकृत माहिती दिली आहे. कामादरम्यान नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले. गर्डर टाकण्याच्या कामासाठी काही ठराविक दिवशी रेल्वे वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत. दि.२३, २४, २६, २७ आणि २८ ऑक्टोबर २०२६ विहित कालावधीत रेल्वे गाड्यांच्या वेळेत बदल व काही गाड्या उशिराने धावतील. संबंधित परिसरातील प्रवाशांनी आणि वाहनधारकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा. धर्माबाद रेल्वे मार्गावरील दोन प्रमुख ठिकाणी एकाच वेळी अत्यंत वेगाने काम सुरू आहे. मौजे अतकुर कार्यक्षेत्रातील रेल्वे व बाळापूर येथील दोन्ही रेल्वे फाटक कायमस्वरूपी बंद झाल्याने शेतकरी, नागरिक आणि शाळकरी विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. उड्डाणपूल पूर्ण झाल्यानंतर धर्माबाद शहराचा इतर प्रमुख शहरांशी थेट आणि सुरक्षित संपर्क जोडला जाईल. नांदेड, हैदराबाद, बिलोली, भोकर, निजामाबाद, भैंसा, देगलूर या गावांना उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर धर्माबाद शहराच्या विकासाला मोठी गती मिळणार आहे. त्यामुळे गर्डर टाकण्याच्या या ५ दिवसांच्या कालावधीत नागरिकांनी पर्यायी मार्गांचा अवलंब करावा आणि रेल्वे व सार्वजनिक बांधकाम विभागाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## पान १ वरुन जरांगेंच्या पाचशे कोटींच्या...

असल्याचा आरोप केला आहे. कथित ऑडिओ क्लिपमध्ये मराठा समाजातील काही नेत्यांना पुढे करून जरांगे यांना प्रत्युत्तर देण्याची रणनीती, त्यासाठी निधी उभारणे तसेच मोर्चे आणि वाहनांचा खर्च उचलण्यासंदर्भातील चर्चा असल्याचा दावा त्यांनी केला. मात्र, या कथित संभाषणातील दाव्यांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही. क्लिपची सत्यता आणि त्यातील आवाजांची ओळख अधिकृत तपासातून स्पष्ट होणे आवश्यक आहे.

### तपासातूनच सत्य बाहेर येणार

५०० कोटी रुपयांच्या कथित व्यवहाराचा आरोप, ऑडिओ क्लिपमधील संभाषण आणि त्यावरून सुरू झालेली राजकीय आरोप-प्रत्यारोपांची मालिका यामुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. एका बाजूला जरांगे यांनी षड्यंत्राचा आरोप केला आहे, तर दुसरीकडे शिंदे गट आणि भाजपने चौकशीची मागणी केली आहे. त्यामुळे आता या कथित ध्वनिमुद्रिकेची सत्यता, तिचा स्रोत आणि त्यातील दाव्यांची विश्वासार्हता तपासातून कितपत स्पष्ट होते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### ऑडिओमध्ये भाजप नेत्यांच्या आवाजाचा संशय-खा.मस्के

दरम्यान या ऑडिओ क्लिपमध्ये भाजप नेत्या श्वेता शालीनी, आ.अतुल भातखळकर, निधी कामदार यांचा आवाज असल्याचा संशय शिवसेनेचे खा.नरेश मस्के यांनी व्यक्त केला आहे. ही ऑडिओ क्लिप फॉरेन्सिक तपासणीसाठी सायबर सेलकडे द्यावी अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. दरम्यान ऑडिओ क्लिपची सत्यता तपासणीसाठी पोलीसांत तक्रार करावी. मनोज जरांगे पाटील यांनी विनाकारण उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विनाकारण टीका करु नये अशी सुचना खा.मस्के यांनी माध्यमांशी बोलतांना केली.

## पान १ वरुन दिवाळीत पुणे-मुंबईहून...

प्रवाशांची होणारी ही पिळवणूक थांबविण्यासाठी प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.पुणे-नांदेड आणि मुंबई-नांदेड या दोन्ही मार्गांवर येण्या-जाण्यासाठी प्रत्येकी किमान दोन विशेष रेल्वे गाड्या सुरू कराव्यात. तसेच, प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन अतिरिक्त रेल्वे डबे उपलब्ध करून द्यावेत आणि खासगी ट्रॅव्हल्सकडून अवाजवी भाडे आकारले जात असल्याच्या तक्रारींची चौकशी करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.दिवाळीच्या सणात नागरिकांना सुरक्षित, सुलभ आणि परवडणारा प्रवास करता यावा, यासाठी रेल्वे प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने योग्य ती कार्यवाही करावी, असे आवाहन किशोर देशमुख यांनी केले आहे.या प्रसंगी निलेश कुंडुरकर, आदित्य शिरफुले, श्रीकांत राठोड, लक्ष्मण कल्याणकर, नवनाथ कपाटे, आशिफ खान, समद खान, श्याम कदम देशमुख आणि किरण मुत्तेपवार उपस्थित होते.

### महानगरपालिकेच्या गुंठेवारी...

नियुक्त शोधपथकाच्या कार्यवाहीचा संपूर्ण अहवाल देण्याची मागणी करण्यात आली आहे. गहाळ संचिकांपैकी किती संचिका पुन्हा मिळाल्या, त्या शेवटच्या कोणाच्या ताब्यात होत्या, उर्वरित १०६ प्रकरणांची स्थिती काय आहे, तसेच विभागीय चौकशीचा अंतिम निकाल काय लागला, असे प्रश्नही आ. पवार यांनी उपस्थित केले आहेत. अभिलेखांच्या सुरक्षिततेची जबाबदारी असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भूमिका तपासली जावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

### औरंगाबाद विभाग पदवीधर...

उपविभागीय अधिकारी अनुप पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदान प्रक्रिया निर्भय, निष्पक्ष व सुरळीत पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी नांदेड जिल्ह्यातील सर्व पदवीधर मतदारांना शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी मतदान केंद्रावर उपस्थित राहून आपला मतदानाचा हक्क आवर्जून बजावण्याचे आवाहन केले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४